# Presentation of the powada to President Pratibhatai Patil



# Pratibhatai Powada



भारताच्या पहिल्या मराठी महिला
राष्ट्रपती - प्रतिभा पाटील

## - पोवाडा -

********************

लेखक - लोकशाहीर प्रल्हादसुत विनायक जामखेडकर
बी. ए. (ऑ) एलएल.बी.
उपजिल्हाधिकारी (से. नि.)
३१४, नवीपेठ, जळगाव पूर्व खान्देश महाराष्ट्र - ४२५००१
फोन : (०२५७) २२२८३३६

भारताच्या पहिल्या मराठी महिला राष्ट्रपती
प्रतिभाताई पाटील
-पोवाडा-
शाहीर प्रल्हादसुत विनायक जामखेडकर

पहिली आवृत्ती २००७

© सर्व अधिकार विनायक प्रल्हादराय जामखेडकर

प्रकाशक
प्रभा प्रकाशन, प्रभा जामखेडकर
डी. ८०/७९६ एम.आय.जी. कॉलनी, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

मुद्रक : सुपर प्रिंट, बळीराम पेठ, जळगांव फोन : २२२११११

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## शाहीर प्रल्हादसुत विनायक जामखेडकर

गेल्या पिढीतील सुप्रसिध्द महाराष्ट्र शाहीर कविभुषण प्रल्हादराय
जामखेडकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव व शिष्य ।
जन्म १९२७ । जळगावकर ।
शाहीरीच बाळकडू घरातच ।
रेव्हेन्युखात्यात नोकरी व तेथूनच
उपजिल्हाधिकारी म्हणून सेवानिवृत्त ।
अल्प बचत खात्यात सहसंचालक पदी
असतांना अल्प बचतीचा पोवाडा गाजला ।
इतरही काव्य रचना ।
आकाशवाणी व दूरदर्शन वर कार्यक्रम ।

खान्देशकन्या मा. महामहिम राष्ट्रपती
सौ. प्रतिभाताई पाटील यांचा

मे. लुंकड ॲल्युमिनियम लि., जळगाव

च्या वतीने सत्कार
सोहळ्या सन्माना प्रित्यर्थ





स्व. भैय्यासाहेब उर्फ
नथमल सागरमल लुंकड



सुरेंद्रकुमार नथमलजी लुंकड,
व्यवस्थापकीय संचालक

लुंकड ॲल्युमिनियम लि. चे आद्य संस्थापक दानशूर व उद्योगपती स्व.
भैयासाहेब उर्फ नथमलजी सागरमलजी लुंकड यांच्या स्मृती प्रित्यर्थ

... यांच्या वतीने सप्रेम भेट

।। श्री गणेशाय नमः ।।

# भारताच्या पहिल्या मराठी महिला राष्ट्रपती - प्रतिभा पाटील

# - पोवाडा -

- शाहीर प्रल्हादसुत विनायक जामखेडकर, जळगाव

प्रतिभेचा साक्षात्कार । झाला जगभर । नवल हे थोर ।
राष्ट्रपती मुकुट शिरी चढला । मान प्रथमच महिलेला ।
विनायक गात पोवाड्याला ।। धृ ।।
प्रतिभा ताई राष्ट्रपती झाल्या । भरत खंडाला । झाला
बोलबाला । जळगावच नाव झळके जगतता । मराठी बाणा
मान्य पावत । प्रल्हादसुत मुजरा करी आनंदात ।। धृ ।।

चौक - १ -

जन्म बालपण शिक्षण

चाल -

खानदेशी असे नाडनाव । कुणी नाही तिथे नाडत ।।
सुख शांती गावी बागडत । नारायणराव तिथे नांदत ।।
भाग्य कुळाचेही उघडत । कुलदीपक वंशी घडतात ।।
१९३४ सालात । डिसेंबरचा महिना उजडत ।।
१९ तारखेचा दिन । बुधवारी भाग्य जन्मत ।।

कन्या रत्न तवा प्रकटत । प्रतिभेचा किरण पसरत ।।
नारायणराव मनी चिंतत । भविष्याचा बेत योजीत ।।
उच्च संस्कार आणि शिक्षण । ज्ञानखत सतत देतात ।।

चाल -

चाळीसगावी आले नोकरीला ।
श्री गणेशा शिक्षणाचा झाला ।
वकीलांचा जमला गोतावळा ।
पाटसकर नाना भन्डारी याच गावाला ।।
देशभक्ती राष्ट्रप्रेम हेचि सदा चर्चेला ।।
वातावरण भारलेल पडे सदा कानाला ।।
जळगावी मुक्काम हलविला ।
घरी शिकून तिसरी चवथीचा धडा गिरविला ।।
न्यू इंग्लिश स्कुल मध्ये दाखल पुढच शिकण्याला ।।

चाल -

मन लावून अभ्यास केला ।
परिणाम दिसू लागला ।
अकरा वर्ष झाली वयाला ।
एकदा नाना पिता पुसताती काय कन्येला ।।
मोठेपणी व्हायच काय तुला ।
कलेक्टर का गव्हर्नर हेच सांगाव मला ।।
पळभर विचार मनी केला ।
नानांना प्रश्न तिन केला ।

या पैकी मोठ कोण आधी सांगाव मला ।।
चतुराई आली ध्यानाला ।
कलेक्टरहून मोठा गव्हर्नर मान प्रांताला ।।
चटकन म्हणे वडिलांना ।
मोठेपणी गव्हर्नर होणार मनसुबा केला ।।
पोरीचे पाय पाळण्यात दिसले त्या वेळा ।।
निश्चयाच फळ भाग्याला ।
पुढे गव्हर्नर पद तिला ।
राज्यपाल राजस्थानाला ।
त्यावरही कळस चढविला ।
राष्ट्रपती पदी झाली आरूढ बोल खरा केला ।।१।।

चौक - २ -

चाल -

जळगावमधल एमजे कॉलेज । देशाच्या पिढ्या घडवत ।।
प्रवेश घेतला याच कॉलेजात । देशाच भाग्य घडवत ।।
नियमित करी अभ्यास । आदर्श विद्यार्थिनी होत ।।
टेबल टेनिस खेळण्यात रस । प्राविण्याने नाव कमवत ।।
चॅम्पियन ट्रॉफी जिंकत । बाजाच्या पेटीवर हात ।।
हौस पुरी सार्या कामात । व्यक्तित्व होई विकसित ।।
६२ साली कमालच होत । कॉलेजक्विन म्हणून घोषित ।।
संधीचा पुरेपूर लाभ । ज्ञान आरोग्य संपादित ।।
बी.ए.एम.ए. पदव्या मिळवूनी । कायद्याची पदवी मुंबईत ।।

चाल -

योग्य गुरू मिळता आयुष्यात ।
तोच योग होता भाग्यात ।
वाय एस महाजन प्रिंसिपॉल थोर गुरू लाभत ।।
खासदार म्हणूनही ख्यात ।
विद्यार्थ्यांच हित सदोदित वसत त्यान्च्या हृदयात ।।
तुझी कुवत मला माहित ।
समाजाला करण्या उन्नत ।
देशाला करण्या प्रगत ।
राजकारण प्रभावी साधन आपल्या हातात ।।
यशवंत नक्की होशील आशीर्वाद देत ।।
गुरू आज्ञा होताची निश्चय पक्का होत ।।
जीवनास मिळे कलाटणी आव्हान पेलत ।।
होम गार्ड कमांडर खाकी वेष शोभत ।। - २ -

चौक - २ -

<u>राजकारणात उडी</u>

६५ साली जुलै महिन्यात । होत विवाहित ।
हाच शुभ शकून । डॉक्टर देविसिन्ग पती अनुरूप ।
सुखी जीवनाचा पाया घातला ।
उडी घेतली राजकारणात ।।
राजकारण समाजकारण । असावी जाण । आपण कोण ।
नसू मालक फक्त सेवक । सेवाव्रत फक्त कर्म एक ।

फळावर नाही हक्क सांगत ।।
सेवा व्रत हेच आचरण । श्रेष्ठ सद्‌गुण ।
हेच यश सचोटी निष्ठा कडी मेहनत ।
मानवी चेहरा त्यासी देत ।
गोरगरिबांच्या हजर सेवेत ।।
उडी घेतली राजकारणी । निर्धार मनी । ध्येय ठरवूनी ।।
कर्मावर फक्त माझ्या अधिकार ।
फलाची आशा नाही धरणार ।
उन्नतीस लावी सदा हातभार ।।

चाल -
६५ साली केल मुहूर्ताला ।
एदलाबाद संघ निवडला ।
तीनवेळा काबिज केला ।
तवापासन् पाहिल ना मागे यश सदा पदराला ।।
निष्ठा नेहरू - गांधी घराण्याला ।
जनकल्याण ध्यास घेतला ।
क्षणोक्षणी चिन्ता दीनांची सेवा करण्याची उमंग खाशी ।।
लोकशाही प्राण देशाचा घटना आमुची खाशी ।।
आमदार आणि खासदार ।
मंत्रीपदे भुषविली फार ।
छाप पाडली कामावर ।
मार्गदर्शक लाभले थोर ।
विविधांगी अनुभव असे कुणा मिळणार ।।

शंकरराव चव्हाणांचा होता डोईवर कर-मार्गदर्शनी-कर ।।
मुख्य मंत्री झाले चार ।
वसंतदादा भोसले चव्हाण आणि पवार ।।
यांच्या हाताखाली कामाचा अनुभव थोर ।।
गणती करा खात्यांची बर ।
एकुण भरतिल डझनावर ।
नजर फिरवा यादीवर ।
आवाका कामाचा ध्यानात येईल बर ।।
८५ साली राज्य सभेवर ।
उपाध्यक्ष पदाचा भार ।
अध्यक्ष समित्यांचे इतर ।
१० व्या लोकसभीही निवड पुन्हा होणार ।।

चाल -
बालपणीचा बोल खरा केला । चार सालाला ।
राजस्थानाला । गर्व्हनरपदी झाली नेमणुक ।
पहिल्यांदाच महिलेस मिळाला मान ।
धर्मांतर विरोधी बिल तिथे नाकारत ।।
किती भुषविली तिन पद ।
त्याची नाही काही मोजदाद ।
प्रदेशाध्यक्ष काँग्रेसची होत ।
डायरेक्टर पद अनेक सदा कामामधी रमत ।।
असे साधी सुधी महिला ।
असामान्य वागण्याची कला ।

हा शालीनतेचा पुतळा ।
महिलांचा खास कळवळा ।
रंजला किंवा गांजला ।
मदतीचा हात पुढे आला ।
आलेख यशाचा उंच उंच चालला ।।

चाल -
भरीव सामाजिक कामे करूनी । दिला दिलासा सर्वांना ।
काम करणाऱ्या महिलांसाठी । वसतीगृहे शहरांना ।।
महिलांसाठी प्रतिभा बँक । स्थापन केली जळगावला ।
मूक बधिर अन् अपंगांच्या । श्रमसाधना दिमतिला ।।
इंजिनिअरिंग कॉलेज बांभोरिस तरूणांनाही हात दिला ।
एदलाबादला साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मदतीला ।।
मी पाठीशी तुमच्या सेवेशी । आधार भक्कम समयाला ।
ताई म्हणूनी मान्य जाहल्या । बहीण मिळाली आम्हाला ।।



## चौक - ४ -

### राष्ट्रपती प्रतिभाताई

चाल -
कळस चढला यशो मंदिरी । किर्ती जगभरी ।
लोकशाही खरी । राष्ट्रपती निवडणूक जिंकत ।
२५ जुलैच्या सात तारखेस ।
तत्व मूल्यांची जाहली जीत ।।

रंगली निवडणुक भारी । पक्षांची दरी । उघडी सारी ।
देशाच उघड झाल मन । प्रतिभाताईस मिळे सन्मान ।
भारतीय महिलेचा मान ।।
६६ टक्के मिळाली मत । करूनी मात । राष्ट्रपती होत ।
लोक पाठिंबा देति भक्कम । जीवन मूल्यांना देती मत ।
कृतज्ञता ताई व्यक्त करतात ।।

चाल -
भैरोवसिंग शेखावत । तात्काळ राजीनामा देत ।।
सोनिया अन् पंतप्रधान । सर्वप्रथम शुभेच्छा देत ।।
मनमोहन सांगती सत्य । हा विजय कुणाचा होत ।।
विघटन शक्तिवर मात । निधर्मीवाद जिंकत ।।
सोनियाजी आनंदी होत । एकजुटीचे आभार मानत ।।
शिवसेना होतसे मुदित । मराठीस मिळे सन्मान ।।

चाल -
आधी महिनाभर गोंधळ ।
प्रचारात नाही ताळमेळ ।
कोणाच्या गळी पडे माळ ।
उमेदवार करती धावपळ ।
ताईंना घालती गळ ।
दोन उमेदवारांचा खेळ ।
भैरोवसिंग शेखावत आणती उसन बळ ।
दोन्ही शक्ती दंड ठोकत ।

बदनाम करण्याचा बेत ।
ताई शांत चित्त राहतात ।
जाहीर करा मालमत्ता द्याव स्वेच्छेने मत ।।
नाही रूचला कुणालाही बेत ।
मत विरोधकही देत ।
तीच गत महाराष्ट्रात ।
भाजपला नाही मानत ।
शिवसेना पाठिंबा देत ।
२६८ मधी २२३ मिळवीत ।।
निकाल जेव्हा जाहीर होत ।
आनंदी आनंद देशभर होत स्वागत ।।

चाल -
इतिहास घडविती ताई । शपथ घेताई ।
थोर पुण्याई संत तुकोबांचा घेई आधार ।
रंजले गांजले माझे म्हणणार ।
वचन महात्म्याच आचरणार ।। -४-

चौक -५-
शपथ सोहळा
चाल -
सेंट्रल हॉल नटलाथटला । स्वागत करण्या उत्सुक ।
पहिल्यावहिल्या महिला राष्ट्रपतीच । राजभवनी स्वागत ।।
आगळा वेगळा सोहळा भारती । प्रथमच होई संपन्न ।
जमले प्रतिष्ठित आतुरतेन । टिपण्या ऐतिहासिक क्षण ।।
सात सालातिल सातवा महिना । २५ तारीख बुधवार ।
आजी माजी राष्ट्रपती मग सन्मानपूर्वक येणार ।।
ल्याली साडी पदर डोईवर शालीनतेचा संस्कार ।
सरन्यायाधिश बालकृषण्णन् शपथ पदाची देणार ।।
आसने बदलून एकमेकांची । घेई नव्याचा पदभार ।
२१ तोफांची सलामी झडली । दुंदुभी साऱ्या जगभर ।
नवे राष्ट्रपती प्रथम मानीती । सर्व देशाचे आभार ।।
आश्वासन देती देशाला कामे कोणती करणार ।।
भ्रुणहत्या आणि कुपोषणास्तव ठोस कार्य करणार ।
खास भर गरिबी हटविणे उपाय योजना करणार ।।
रंजल्या गांजल्या आपुलकीचा हात मदतीचा देणार ।
फक्त लोकांची राष्ट्रपती मी जाणीव सदोदित ठेवणार ।।
दिल्ली मुंबई गावोगावी ढोल यशाचे वाजत ।
जळगावकरांच्या आनंदाला तोड नाही जगतात ।।

चाल -
जळगावी झाला जल्लोष । वाद्यांचा घोष । हर्ष उल्हास ।
जिल्हाभर साजरा होई उत्सव ।
तोड नाही धन्य धन्य जळगाव ।
जगभर डंका पसरल नाव ।।

चाल -
ढोल ताशांचा गजर ।
बेभान सारे नाचणार ।
गुलाल लाल रंग देणार ।
देहभान विसरूनी सामील सारे शहर ।।
शहरातील पांडे चौकात ।
लोकांचा गराडा पडत ।
आतषबाजी आणि उत्साह ।
दाणा बाजार शाळा कॉलेजात ।
उत्साहाचा महापूर येत ।
आमच्या ताई राष्ट्रपती होत ।
वर्णावा किति सोहळा भाग्य उजळत ।।
नाडगाव मागे नसे शिरा पेढे वाटत ।।

चाल -
अरूण गुजराथी लेलेकाका नाथाकाका आणिक ।
आचार्य डॉक्टर निकम ॲडव्होकेट जैन भवरलाल प्रख्यात ।।
व्यंकटेश शंभू फडणीस आणि एमजे कॉलेज प्रमुदित ।
सांगती मनोगत मान्यवर परी घ्यावे पुरते ध्यानात ।।

चाल -
राष्ट्रपती पदाचा ठसा ।
उमटावा तुमचा खासा ।
रबर स्टॅम्प चा ठसा ।
वापरू नका तुम्ही तो पुसा ।

चाल -
ताई चोख देती उत्तर । मी जनतेची चाकर ।।
राष्ट्रपती जरूर होणार । फक्त राष्ट्रपती लोकांची बर ।।

चाल -
देशाच सर्वोच्य पद । आज भुषवित । महिला प्रख्यात ।
आम्हासी खास त्यांचा अभिमान ।
ताई खात्रीन वाढवी शान ।
लोकशाही मुल्य सदा जपणार ।।
ताई नाही फक्त त्या आमुच्या । मानवतेच्या ।
लोकशाहीच्या । गोरगरिबांच्या बनुनी आधार ।।
सारा देश गाई पोवाडा । किर्ती चौघडा । वाजे धडधडा ।
प्रल्हादसुत विनायक शाहीर ।
मुजऱ्याने व्यक्त करी आदर ।
देशाच प्रकट केला उर ।। -५-
मिळवणी - प्रतिभेचा साक्षात्कार । झाला जगभर ।
नवल हे थोर । राष्ट्रपती मुकुट शिरी चढला ।
मान प्रथमच महिलेला ।
विनायक गात पोवाड्याला ।। धृ ।।
प्रतिभा ताई राष्ट्रपती झाल्या । भरत खंडाला ।
झाला बोलबाला । जळगावच नाव झळके जगतात ।
मराठी बाणा मान्य पावत ।
प्रल्हादसुत मुजरा करी आनंदात ।। धृ ।।
।। संपूर्ण ।।



श्री. जामखेडकर वि. प्र.
बी.ए. एलएल.बी.
उपजिल्हाधिकारी (से.नि.)
३१४, नवीपेठ, जळगांव
जा.क्र. वि.प्र.जा./पोरा/१/०७
जळगांव दि. २८/८/२००७

आदरणीय व सन्मानिय
सौ. प्रतिभाताई पाटील
राष्ट्रपती भारत सरकार
राष्ट्रपती भवन,
सफरचंद जंग रोड, नवी दिल्ली

पूज्य आदरणीय राष्ट्रपती महोदयीस,
स. न.वि. वि.

आपण भारताच्या राष्ट्रपती पदी विराजमान झाल्यावर शतशः मन आनंदाने हर्षोत्फूल झाले. त्यामुळे जळगांव शहराची शान अन मान संबंध देशात व जगात उंचावलेली आहे. त्यामुळे फार अभिमान वाटतो. या गौरवा प्रित्यर्थ माझा खारीचा वाटा म्हणून व जळगांववासी असल्याने आपल्यावर एक अल्पसा पोवाडा रचलेला या सोबत जोडून पाठवत आहे. त्याचा स्विकार करून आपला अभिप्राय जरूर जरूर कळवावा.

भविष्यात जळगांव येथे होणाऱ्या आपल्या नागरी सत्कारांत माझे वय ८२ चे घरांत असले तरी तो गावून दाखवण्याचा मनोदय आहे व जबरदस्त इच्छा आहे.

आपणास दिर्घायुष्य व आरोग्य लाभो व रंजल्या गांजलेल्यासाठी राष्ट्रपती म्हणून ठोस चिरंजन स्वरूपी अविस्मरणीय कार्य होवो ही इच्छा !

आपला कृपाभिलाषी
(वि.प्र. जामखेडकर)